MHPU180018842023

नि. दिवाणी दावा क्र. ३०८/२०२३
सुमन व इतर
विरुध्द
दत्तात्रय व इतर

निशाणी क्रमांक २३ वरील आदेश
(पारीत दिनांक १६/०१/२०२५)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी लेखी कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ करुन लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबत दाखल केलेले आहेत.

२. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादी यांनी प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी व खरेदी दस्त करीता दाखल केलेला असून त्यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर ते न्यायालयात हजर झाले आहेत. त्यानंतर प्रतिवादी हे आजारी असल्याकारणाने प्रस्तुत दाव्या संदर्भात ते महत्वाची कागदपत्रे इतर कार्यालयातून प्राप्त करुन घेऊ शकले नाहीत. सदरचा झालेला विलंब हा अनावधानाने व वैयक्तीक कारणामुळे झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणून बूजून झालेला नाही. त्यामुळे लेखी कैफियत दाखल कामी झालेला विलंब माफ करण्याची विनंती त्यांनी केली. तसेच प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेण्याची विनंती देखील त्यांनी केली.

३. वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज हा दाव्याचे कामकाज लांबवण्याकरीता दिलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना अनेक वेळा संधी देऊन देखील त्यांनी लेखी कैफियत व म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी व वादी यांचे अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वरिल बाबींचा विचार करता प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार त्यांना संबंधीत महत्वाची कागदपत्रे वेळेत न मिळाल्यामुळे ते लेखी कैफियत वेळेत दाखल करुन शकले नाहीत. या उलट वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी संयुक्तीक कारण दिले नसून त्यांचा अर्ज खरा व बरोबर नाही. संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा स्थावर मालमत्तेबाबतचा आहे.

५. अभिलेखावरुन असे देखील दिसून येते की, प्रस्तुत प्रतिवादी यांना दि. १६/०१/२०२४ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी करण्यात आलेली आहे. तसेच

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी दि. २५/०६/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याकामी निर्धारीत वेळ वगळता दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. परंतु, प्रस्तुतचा दाव्याचा विचार करता प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वानुसार म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करता प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. मात्र त्याच बरोबर वादी यांना प्रतिवादीमुळे झालेला विलंबाबाबत भरपाई देणे आवश्यक असल्यामुळे मी, पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. सदरचा अर्ज रक्कम रुपये ४००/- (रुपये चारशे फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची लेखी कैफियत स्वीकारण्यात येईल.

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2025.01.18 10:41:39 +0530

दिनांक- १६/०१/२०२५.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 16/01/2025. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 16/01/2025. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 18/01/2025. |